**MHRG040054002025**

**दिवाणी किरकोळ अर्ज नं. १६५०/२०२५**

**श्री. ओमप्रकाश यादव व इतर**

**विरूध्द**

**कोणीही नाही**

**पाचवे सह. दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर, पनवेल, यांचे न्यायालयात**

(पिठासीन अधिकारीः आर.वाय.खंडारे यांचे समक्ष)

**निशाणी ०१ खालील आदेश**

**०१.** अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज १८२७ च्या बॉम्बे रेग्युलेशन क्र. VIII अन्वये वारस दाखला मिळणेकरिता दाखल केला आहे.

**०२.** अर्जदार क्र. १ हे **मयत क्रिष्णा ओमप्रकाश यादव उर्फ कृष्णा यादव** यांचे पती असुन अर्जदार क्र. २ व ३ हे त्यांची मुले आहेत. मयत क्रिष्णा ओमप्रकाश यादव उर्फ कृष्णा यादव हया दिनांक १३/०१/२०१५ रोजी मयत झाल्या आहेत. मयत क्रिष्णा ओमप्रकाश यादव उर्फ कृष्णा यादव यांना अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या व्यतिरिक्त दुसरे कोणीही वारस नाही. मयत क्रिष्णा ओमप्रकाश यादव उर्फ कृष्णा यादव यांच्या नावावर अर्जाच्या परिच्छेद क्र. ३ मध्ये नमुद असलेली मालमत्ता आहे व मयत क्रिष्णा ओमप्रकाश यादव उर्फ कृष्णा यादव यांच्या मृत्यूनंतर सदर मालमत्तेतील त्यांच्या हिश्श्याला अर्जदार क्र. १ ते ३ यांचे नाव वारस म्हणुन लावण्यासाठी वारस दाखला मिळावा म्हणून अर्जदार क्र. १ ते ३ यांनी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

**०३.** अर्जदारांनी **नि.क्र.८** प्रमाणे दि. ०७/०१/२०२६ रोजी जाहिरनामा व दि. ०१/०१/२०२६ रोजी 'किल्ले रायगड' या पेपरमध्ये जाहिर नोटीस दिल्यानंतर ३० दिवसांत कोणीही सदरच्या अर्जास हरकत घेतलेली नाही.

०४. वरील कथनास पुष्टी देण्याकरिता अर्जदार यांनी त्यांचे तर्फे अर्जदार क्र.०२ अमित कुमार यादव यांचे पुराव्याचे शपथपत्र **नि.क्र.११** वर दाखल केले आहे. त्यांनी त्यांच्या आईच्या मृत्यूच्या दाखल्याची पडताळलेली प्रत **नि. १२** वर दाखल केली आहे. त्यांच्या आई व वडिलांच्या नावावर असलेल्या मालमत्तेच्या नोदणीकृत करारनामा क्र.१३१९४/२०१० ची पडताळलेली प्रत **नि. १३** वर दाखल केली आहे. त्यांच्या वडिलांच्या नावे असलेल्या रेशनकार्डची पडताळलेली प्रत **नि. १४** वर दाखल केली आहे. सदर मालमत्तेच्या ताबा पत्राची पडताळलेली प्रत यादी **नि.१६** सोबत दाखल केली आहे. तसेच अर्जदारांच्या आधार कार्डच्या सत्यप्रती दाखल केल्या आहेत. **आर्टिकल 'अ'** वर वृत्तपत्रात जाहिर करण्यात आलेली नोटीस दाखल करण्यात आलेली आहे. या व्यतिरिक्त **नि.०८** वर जाहिरनाम्याची बजावणी करण्यात आलेली आहे. अर्जदार क्र. १ ते ३ यांनी **नि.क्र. १७** वर पुरावा बंद पुरसिस दाखल केली आहे.

०५. अर्जदार क्र. १ ते ३ यांनी साक्षीमध्ये सांगितलेल्या कथनास कागदपत्र दुजोरा देतात. **नि.क्र. १३** वरील कागदपत्र व तसेच **नि. १६** वरील यादीसोबत दाखल कागदपत्रानुसार सदर प्रकरणातील मालमत्ता मयत क्रिष्णा ओमप्रकाश यादव उर्फ कृष्णा यादव यांच्या नावाने असल्याचे दिसुन येत आहे. अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या व्यतिरिक्त मयत क्रिष्णा ओमप्रकाश यादव उर्फ कृष्णा यादव यांना इतर कोणीही वारस नाही. अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या व्यतिरिक्त मयत क्रिष्णा ओमप्रकाश यादव उर्फ कृष्णा यादव यांना कोणीही वारस नसल्याबाबतचा अर्जदार क्र. १ ते ३ यांचा पुरावा विना आव्हानित असल्यामुळे त्यास शंका घेण्याचे कोणतेही कारण दिसून येत नाही. वरील विवेचनावरून अर्जदार क्र. १ ते ३ हे मयताचे वारस असल्याचे समाधान झाल्यावरून अर्जदार क्र. १ ते ३ हे वारसाचा दाखला मिळविण्यास पात्र असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश पारित

करित आहे.

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १ | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |
| २ | अर्जदार क्र. १ **श्री. ओमप्रकाश यादव**, अर्जदार क्र. २ **श्री. अमित कुमार यादव** व अर्जदार क्र. ३ **श्री. पवन कुमार यादव** हे **मयत क्रिष्णा ओमप्रकाश यादव उर्फ कृष्णा यादव** यांचे परिच्छेद क्र.३ मध्ये नमुद मिळकतीमध्ये त्यांच्या हिश्शाचे वारस असल्याचे वारस प्रमाणपत्र मिळकतीच्या मुल्यांकनावर योग्य ती कायदेशीर कोर्ट फी आकारून अर्जदार यांना देण्यात यावे. |
| ३ | सदरचे प्रमाणपत्र हे वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) असून ते उत्तराधिकारी प्रमाणपत्र (Succession Certificate) नाही. |
| ४ | नाझर यांनी कायद्याप्रमाणे आवश्यक असलेली कोर्ट फीचा तपशिल द्यावा. |
| ५ | सदर प्रमाणपत्र दिवाणी नियमावली प्रकरण १४ परिच्छेद ३१२ मधील टिपणीस अधीन राहून देण्यात येत आहे. अर्जदार यांनी प्रमाणपत्र प्राप्ती पासून वरील टिपणीस अनुसरून पुढील पूर्तता करावी. |

RAJESH YASHWANTRAO KHANDARE

Digitally signed by RAJESH YASHWANTRAO KHANDARE
Date: 2026.04.23 17:22:17 +0530

**दि. २३/०४/२०२६** **(आर.वाय.खंडारे)**

**पनवेल.** **पाचवे सह दिवाणी न्यायाधिश, व. स्तर पनवेल.**